# दिनांक ०२.०९.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक ०२.०९.२०२५ रोजी स. ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.अतिरिक्त आयुक्त (२), महानगरपालिका, अमरावती
मा.मुख्यालेखाधिकारी, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. १, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. २, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ३, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ४, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ५, महानगरपालिका, अमरावती
मा.स.स.न.र., महानगरपालिका, अमरावती
मा.कार्यकारी अभियंता,सा.बां.वि.,अमरावती (प्रतिनिधी)
मा.श्री. मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई, अमरावती
मा.श्री. अनिल घोम, वृक्ष तज्ञ, विद्यापीठ ,अमरावती
मा.श्री.विलास देशमुख , वृक्ष तज्ञ, अमरावती
उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती
वृक्ष गणना करणारे कंपनीचे प्रतिनिधी
मा.श्री.राम भोजने,संचालक, ORNET TECHNOLOGIES PVT.LTD. NAVI MUMBAI.

## दि.०२/०९/२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृत्तांत

## झोन क्र.१

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | **श्री. किरण रामदास पकडे, दळवी लेआऊट, सिध्दीविनायक नगर, अमरावती** | १ कडूनिंब (फांद्या) | ०१ वृक्ष | दिनांक १५/०८/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. कडूनिम झाडाच्या (रस्त्यावरील) खालच्या भागाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **रस्त्याकडे गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **रस्त्याकडे गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २. | **श्री. पुंडलिक आश्रुजी पवार,** | कडूनिंब (फांद्या) | ०१ वृक्ष | दि.१५/०८/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर कडूनिम झाड रस्त्यालगत असुन हिरवेगार आहे. कडुनिम झाडाच्या | **विद्युत** | **विद्युत तारामध्ये** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **एल.आय.सी. कॉलनी, केवल कॉलनी, जवळ, शेगांव रहाटगांव रोड, अमरावती** | | | फांद्या Electric तारात गेलेल्या असल्यामुळे M.S.E.B. च्या सहकार्याने फांद्या काढण्याला परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर | **तारामध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३. | **श्री. अंकीत रा. असोरीया, अरूण होस्टेल रोड, मोरबाग, अमरावती** | पिंपळ १ व बोर १ वृक्ष | ०२ वृक्ष | दि.१५/०८/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर वृक्ष अर्जदाराचे आवारात आहे. बोर व पिंपळ रस्त्यावरील लोकांना ये-जा करतांना सदर झाडाच्या फांद्यामुळे रस्त्यावर आलेल्या **फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **रस्त्यावर गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदारास रस्त्यावर गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४. | **मा. प्राचार्य , शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती** | विविध प्रजाती ४६ वृक्ष | ४६ वृक्ष | दि.१७/०७/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले व दिलेल्या सुचनेप्रमाणे अर्जदाराकडून अहवाल प्राप्त झाला असुन २००० पेक्षा अधिक वृक्ष अर्जदार यांचे अभियांत्रिकी महाविद्यालय परिसरात असल्याचे नमुद केले आहे. अर्जदारास अस्तावेस्त वाढलेल्या ४६ विविध प्रकारच्या वृक्षाच्या ३-४ इंच व्यासाच्या फांद्या ज्या इलेकट्रीक तार व रस्त्यावर जमीनीकडे झुकलेल्या आहेत त्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **विद्युत तारामध्ये व रस्त्यावर आलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **विद्युत तारामध्ये व रस्त्यावर आलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५. | **शाखाधिकारी, अभिनंदन अर्बन को-ऑपरेटीव्ह बॅक लि. न्यु कॉटन मार्केट, अम.** | सिंगापुरी कपोक (गोरख चिंच) वृक्ष (फांद्या) | ०१ वृक्ष | दि.१५/०८/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सिंगापुरी कपोक वृक्षाच्या बॅकेच्या बोर्डावर आलेल्या सदर वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **बॅकेच्या बोर्डावर आलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **बॅकेच्या बोर्डावर आलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६. | **मा.अधिष्ठाता, डॉ.पिडीएमसी , अमरावती** | अमलतास -१, बकुळ-३, सिसम-१ (वृक्ष काढणे) | ०५ वृक्ष | दि.२९/०८/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले अर्जदाराचे परिसरात १५०० पेक्षा अधिक वृक्ष असल्याचे सांगण्यात आले. तसेच मोठया प्रमाणात या वर्षी वृक्ष लागवड केल्याचे दिसुन आले. अर्जदाराला हॉस्पीटल परिसरात ऑक्सीजन प्लॅन्ट उभारायचा असुन त्या जागेवर अडचण ठरणा-या अमलतास-१, बकुळ-३, सिसम-१ असे एकुण पाच वृक्ष काढावयाची आहेत नियमानुसार ठेव स्विकारून ०५ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **ऑक्सिजन प्लांट बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे हमीपत्र सादर करणे या अटीवर ५ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>७.</td><td>श्री. प्रशांत माणिकराव ऐडाखे, भाऊ कॉलनी, राधा नगर, अमरावती</td><td>पामवृक्ष-१</td><td>०१ वृक्ष</td><td>दि.०७/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता भाऊ कॉलनी मध्ये पाम चे एक झाड सार्वजनिक रस्त्यावर आहे. खोडाला किड लागल्यामुळे झाड केव्हाही पडू शकते. त्यामुळे सदर पाम चे झाड काढण्याला परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर.</td><td>धोकादायक वृक्ष काढण्यास हरकत नाही.</td><td>सार्वजनिक जागेवरील धोकादायक १ वृक्ष वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>८</td><td>श्री. भालचंद्र भागवतराव नासरे, सरस्वती कॉलनी अथर्व जिम जवळ, राठी नगर, अमरावती</td><td>गुलमोहर वृक्ष</td><td>०२ वृक्ष</td><td>दि.२९/०८/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता गुलमोहर वृक्ष रस्त्याचे कडेला नालीचे काठावर छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाच्या फांद्याची पुर्वीच मनापचे वतीने छाटणी केल्याचे दिसुन आले. कोणतीही अडचण दिसुन येत नाही. वृक्षाला इजा पोचवू नये असे सुचीत करण्यात यावे. वृक्ष / फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर.</td><td>वृक्ष हिरवेगार असल्याने तोडण्याची परवानगी देता येणार नाही.</td><td>वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>९</td><td>अब्दुल साजीद अब्दुल समद, मौजा नवसारी, स.क्र. ४/१/अ, अमरावती</td><td>निंभ-४, सिताफळ-४, निंबू-३, अशोका-५, बांबु (लहान)-८</td><td>२४ वृक्ष</td><td>दि.२९/०८/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराने जमीन विकसित केली असुन लेआउट पाडण्यात आल्याचे सांगण्यात आले. लेआउट मंजुर प्लान दिसुन आला तथापि लेआउट पर्यंत पोचणारा रस्ता बंद असल्याने तिथपर्यंत पोचता आले नाही. लेआउट मध्ये २४ वृक्ष असल्याचे अर्जात नमुद आहे. सबब अर्जदाराकडून खालील प्रमाणे माहिती मागविण्यात यावी.
<table><tr><td>अ. क्र.</td><td>वृक्ष क्र</td><td>वृक्षाचे नाव</td><td>वृक्षाचे वय</td><td>वृक्षाची उंची</td></tr><tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr></table>
अशा प्रकारच्या सुचना देण्यात याव्या. तुर्त परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पोचवू नये असे सुचीत करण्यात यावे, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर.</td><td>फेर पाहणी करण्यात यावी.</td><td>तांत्रिक सदस्य यांचे सोबत प्रत्यक्ष फेर पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.</td></tr>
<tr><td>१०</td><td>प्रवर अधिक्षक डाकघर, अमरावती विभाग, बिएसएनएल ऑफिस जवळ, अमरावती</td><td>विविध प्रजाती ४८ वृक्ष</td><td>४८ वृक्ष</td><td>दि.२९/०८/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता भारतीय डाकघर विभागाचे परिसरात भरपूर वृक्ष आहेत. त्यांना वृक्षाची छटाई करावयाची आहे. त्यांचे परिसरात असलेल्या वृक्षाची खालीलप्रमाणे माहिती देण्याच्या सुचना दिल्या.
<table><tr><td>अ. क्र.</td><td>वृक्ष क्र</td><td>वृक्षाचे नाव</td><td>वृक्षाचे वय</td><td>वृक्षाची उंची</td></tr><tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr></table>
अर्जदाराकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर फांद्या</td><td>अर्जदाराकडून माहिती मागविण्यात यावी.<br>फेर पाहणी करण्यात यावी.</td><td>तांत्रिक सदस्य यांचे सोबत प्रत्यक्ष फेर पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे. वृक्ष अधिकारी यांनी संबंधितास तसे पत्र द्यावे.</td></tr>
</table>

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | | |
| ११ | **श्री. जयंत एस. काळमेघ, सेक्शन इंजिनियर, पि.डब्ल्यू.डी. म.न.पा. अमरावती** | विविध प्रजाती १३० वृक्ष | १३० वृक्ष | दि.०७/०८/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटीव्ह बॅंक अम. ते वली चौक पर्यंत दोनही बाजुचे विविध प्रजातीचे यादीनुसार ८३ झाडे व राम मोहन नगर, अम. ते पाठयपुस्तक मंडळ, अम. येथील रस्त्यालगतची १४ झाडे अशी एकुण ८३ + १४ = ९७ झाडे हिरवी असुन ती रस्त्यालगतच्या नालीच्या बांधकामात येत असल्यामुळे ९७ X ६०००/- = ५,८२,०००/- अनामत रक्कम म.न.पा. अम. खाती जमा करून परवानगी देण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच पुंडलिक बाबा नगर ते उजवीकडील उद्यानाकडे जाणा-या रस्त्याचे ३३ हिरवेगार झाडे काढण्याची परवानगी नाकारण्याची शिफारस करण्यात येत आहे. कारण रस्त्याच्या कडेला हि सर्व झाडे फार मोठी असुन हिरवीगार आहे. सद्यस्थितीत तेथे नाली असुन ती झाडाच्या नंतर आहे. त्यामुळे झाडाचा कुठेही अडथळा येत नाही. म्हणून सदर ३३ झाडे काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **इंजिनीअर यांनी भरपाई वृक्ष लागवडीचे नियोजन त्याच रस्त्यावर घेण्याचे नियोजन करावे.बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही. बांधकामात न येणारी वृक्ष काढण्यात येऊ नये.** | **विशेष बाब म्हणून १:६ प्रमाणे त्याच क्षेत्रात वृक्ष लावण्याचे हमीपत्र सादर करण्याचे अटीवर ९७ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.नाली बांधकामात न येणारी ३३ वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| १२ | **श्री.मनीष गुणवंतराव बारब्दे, ४४ श्रमसाफल्य कॉलनी, विद्युत नगर मागे, व्ही. एम.व्ही. रोड, अम.** | कडुबदाम वृक्ष | ०१ वृक्ष | दि.२९/०८/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता रस्त्यावरचा वृक्ष असल्याचे सांगण्यात आले. परंतू नेमका वृक्ष कोणता हे सांगण्यासाठी अर्जदार वा त्याचेकडील कुणीही उपस्थित नव्हते. पाहणी करता आली नाही. तुर्त प्रकरण स्थगित ठेवण्यात यावे. वृक्षाला इजा पोचवू नये असे सुचीत करण्यात यावे,असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **फेर पाहणी करण्यात यावी. तुर्त प्रकरण स्थगित ठेवण्यात यावे.** | **तांत्रिक सदस्य यांचे सोबत प्रत्यक्ष फेर पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.तूर्तास वृक्ष काढण्याची परवानगी स्थगित ठेवण्यात येत आहे.** |
| १३ | **श्री. गणेश दादाराव अनासाने, दहिसाथ चौक, भाजीबाजार अमरावती यांची**<br><br>**ऑनलाईन तक्रार** | विविध प्रजाती-१४ वृक्ष | १४ वृक्ष | सदर प्रकरण वृक्ष प्राधिकरण सभा दि.१३/०५/२०२५ ठराव क्र.१० अनुषंगाने कंत्राटदार यांना एक लक्ष रू. दंड आकारण्यात आला आहे. याबाबत उपअभियंता बांधकाम १ यांना दि.२६/०६/२०२५ जा.क्र.२६८ रोजी पत्राने कळविण्यात आले असुन सदर कंत्राटदाराच्या देयकातून कपात करून अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **मियावाकी वृक्ष लागवड बाबत नस्ती तपासणी करण्यात यावी.सदर प्रकरणी चौकशी करण्यात यावी.** | **मियावाकी वृक्ष लागवड बाबत नस्ती तपासणी करण्यात यावी.सदर प्रकरणी चौकशी करण्यात यावी.तसेच तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांनी प्रत्यक्ष** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **पाहणी करून अहवाल पुढील सभेमध्ये सादर करण्यात यावा.** |

# झोन क्र.२

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **श्री. सुरेश पुरषोत्तम दातेराव** | १कडू निंब फांद्या व १ वड पडलेला वृक्ष | २ | दिनांक १४/०८/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे स्वताचे घराचे मागील बाजूस वडाचा वृक्ष विहिरीत निघालेला मोठा वाढलेला होता आधार नसल्याने वृक्ष विहिरी वर कोलमडून सर्विस लाईन मध्ये पडला असून तो वड वृक्ष काढण्याची तात्काळ परवानगी नियमानुसार अर्जदारास देण्यात यावी तसेच कडूनिंब वृक्ष अर्जदाराचे घराचे आवारात समोरील बाजूस छान अजस्त्र वाढलेला असून हिरवागार आहे कडूनिंब वृक्षाच्या पूर्वेकडे रस्त्याकडे झुकलेली १ मोठी १८० से.मी फांदी तसेच अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या ३-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर.अर्जदारास १ वड वृक्ष पडलेला काढण्याची परवानगी देण्यात आली आहे. कार्योतर मंजुरीस सादर. | **वृक्ष पडलेला असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही.** | **वडाचा वृक्ष सार्वजनिक जागेवर पडलेला असल्याने वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अर्जादाराचे घराकडे झुकलेल्या कडूनिंबाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | **विभा ओमप्रकाश सागर , रुख्मिणी नगर अमरावती** | बदाम वृक्ष फांद्या | १ | दिनांक १४/०८/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. बदाम वृक्ष सार्वजनिक जागेवर, रस्त्याचे कडेला छान वाढलेला हिरवागार आहे. अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या २-४ इंच व्यासाच्या २-३ फांद्या मनपा उद्यान विभागाने काढण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर. | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या सार्वजनिक जागेवरील वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३. | **श्री राजेश सतरामजी खत्री , मुधोळकर पेठ बडनेरा रोड अमरावती** | गुलमोहर वृक्ष | १ | दिनांक १६/०७/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. बांधकाम परवानगी सोबत जोडण्यात आल्याचे दिसून आले तसेच स.स.न.र अभियंत्यांनी वृक्ष बांधकामात प्रत्यक्ष येत नसलातरी अंडरग्राउंड पार्किंग करिता वाहने. ये-जा करण्यास अडचणीचा असल्याचे चर्चेत सांगितले | **अंडरग्राउंड पार्किंगमध्ये येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **सार्वजनिक जागेवरील अंडरग्राउंड पार्किंगमध्ये येणारा वृक्ष नियमानुसार ठेव** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे. संबंधित अभियंत्यासी प्रत्यक्ष चर्चा करण्यात आली वृक्ष गुलमोहर १ काढण्याची परवानगी १० वृक्ष लावण्याचे अटीवर ठेव स्वीकारून देण्यास हरकत नाही. अर्जदारानी चर्चेत १० वृक्ष लावण्याचे कबूल केले आहे. उचित निर्णयास सादर. | | **स्विकारून १:१० प्रमाणे वृक्ष लावण्याचे हमीपत्र सादर करण्याचे अटीवर (६०,०००/-) १ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

# झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **श्री.मनोज वानखडे रा.किरण नगर अम.** | कडूनिंब | १ | दि.१८/०८/२५ रोजी मा.तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,कडूनिंब वृक्ष सार्वजनिक जागेवर असून वृक्षाच्या फांद्या घरावर व विद्युत तारांवर झुकलेल्या आहेत.झुकलेल्या फांद्या उद्यान विभागाकडून काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | **श्री. विनोद गावंडे रा.किरण नगर अम.** | कडूनिंब | १ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,कडूनिंब वृक्ष घरालगत पूर्णपणे वाळलेला आहे.कधीही पडून अपघात होऊ शकतो.करिता वाळलेले एक वृक्ष उद्यान विभागामार्फत त्वरित तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष वाळलेला असल्याने वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **वाळलेला वृक्ष उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | **श्रीमती आरती देशपांडे रा.न्यू कॉलोनी** | विविध वृक्ष | ६ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता, मनपा च्या खुल्या जागेवर मोठी झाडे अस्तव्यस्त वाढलेली आहेत.शेजारच्या घरांना त्याच्या फांद्याचा त्रास होत आहे.घरांवर आलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी उद्यान विभागाला देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **सार्वजनिक जागेवरील अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | **श्री.उमेश मोरे रा.राधिका नगर अम.** | गुलमोहर<br>वड<br>कडूबदाम | १<br>१<br>१ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,मंदिरपरिसरात कडूनिंब,वड,कडूबदाम,बदाम वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या चारही बाजूने व विद्युत वाहिनीवर आलेल्या फांद्या काढण्याची परवानगी उद्यान विभागाला देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | **श्रीमती वंदना खोब्रागडे रा.देशपांडे ले-आउट अम.** | कडूनिंब | २ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,अपार्टमेंट बाहेरील सार्वजनिक जागेवर असलेल्या कडूनिंब वृक्षाच्या गॅलरीकडे गेलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी उद्यान विभागाला देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे गॅलरीकडे गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे गॅलरीकडे गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६ | **श्री.भुजंगराव ठाकरे रा.वैभव कॉलोनी** | वड<br>काटसाव र | १<br>१ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,मनपा उद्यानातील वडाचे मोठे झाड अस्तव्यस्त वाढले असून त्याच्या फांद्या विद्युत तारांवर पसरलेल्या आहेत.तसेच काटसावर वृक्षाच्या फांद्या घराकडे झुकलेल्या आहेत.दोन्ही झाडाच्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी उद्यान विभागाला देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ७ | **श्रीमती हर्षाली धांडे रा.केडिया नगर अम.** | पाम | १ | दि.२९/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर फिश टेल पाम वृक्ष अर्जदाराच्या घराच्या आवारात फाटकाजवळ एका कोपऱ्यात सरळ वाढलेला आहे.वृक्ष सुस्थितीत आहे.काहीही अडचण नाही.करिता वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | **वृक्षाची काहीही अडचण नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ८ | **श्री.साईनाथ हिरो शोरूम** | वाळलेला वृक्ष | १ | दि दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली | **वृक्ष वाळलेला** | **वाळलेला वृक्ष उद्यान** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **दस्तूर नगर चौक** | | | असता,सदर वृक्ष पूर्णपणे वाळलेला आहे.वृक्ष रोडवर पडू शकतो.करिता उद्यान विभागामार्फत सदर वृक्ष त्वरित काढण्याकरिता परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **असल्याने वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ९ | **श्री.राजकुमार कावना रा.गायत्री नगर,अम.** | कडूनिंब | १ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता, कडूनिंब वृक्षाच्या घराकडील झुकलेल्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या वृक्षाच्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १० | **श्री.संदीप पाटील रा.प्रशांत नगर अम.** | गुलमोहर<br>बोर | १<br>१ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,गुलमोहरचे वृक्ष फार मोठे आहे.बोरीचे व गुलमोहर वृक्ष दुकानाच्या मागे व दुकानावर वाढलेले आहे.तसेच काही फांद्या रोडवर व विद्युत तारांवर वाढलेल्या आहे.संपूर्ण वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत असली तरी अडचणीच्या ६-८ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे रोडवर झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे रोडवर झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या ६-८ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ११ | **श्री.भाऊराव तुकडोजी गुल्हाने रा.देवी नगर अम.** | जांभूळ<br>कडूनिंब | १<br>१ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,कडूनिंब वृक्षाच्या फांद्या घरावर व विद्युत तारांवर पसरलेल्या आहेत.घराकडील झुकलेल्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे घराकडील झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडील झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १२ | **श्री.छगनलाल यादवराव रंगारी रा.डहाने नगर अम.** | रेन ट्री | १ | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर रेन ट्री वृक्ष जरी घराबाहेर असला तरी त्याच्या दोन मोठ्या फांद्या घरावर व विद्युत तारांवर पसरलेल्या आहेत.तरी ४-६ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी अर्जदाराला देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **अर्जदाराचे घराकडील झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडील झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १३ | **श्री.विष्णुदेव राणे** | वृक्षाला तार | | दि.१८/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली | **ताकीद देणारे पत्र देण्यात** | **गैर-अर्जदारास ताकीद देणारे पत्र** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **रा.व्यंकटेश कॉलोनी.अम. गैर-अर्जदार श्री बाबाराव डिके रा. व्यंकटेश कॉलोनी.अम** | लाऊन इजा केल्याची तक्रार | | असता,सदर जागा सार्वजनिक व रोडला लागून आहे.तक्रारदाराची त्या जागेवर चहाची टपरी होती.ती अतिक्रमण विभागाने काढली.त्याच जागेवर मंदिर आहे.मोकळया जागेवर त्या मंदिर संस्थेने वृक्ष लाऊन तार कम्पाउंड केले आहे.परंतु तार कम्पाउंड करतांना झाडांना खिळे ठोकून कम्पाउंड केले होते.त्यामुळे झाडांना इजा होत आहे.करिता गैर अर्जदार श्री बाबाराव डिके यांना झाडावर लावलेले तार काढण्याविषयी पाहणी दरम्यान सांगितले होते त्यानुसार त्यांनी वृक्षाला लावलेले तार काढले आहे. गैर अर्जदार यांना यापुढे वृक्षांना इजा होणार नाही याची सक्त ताकीद देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **यावे.** | **देण्यात यावे.** |
| १४ | **श्री.महेंद्र नरसिंग बोडे रा.फ्रेजरपुरा अम.** | वाळलेले वृक्ष | १ | दि.२९/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,अर्जदाराच्या घरातील आवारात समोरील गेटला लागून एक वृक्ष पूर्णपणे वाळलेला आहे.वादळामुळे पडू शकतो.करिता एक वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्ष वाळलेला असल्याने वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १५ | **श्री.विवेक सोळंके कार्यकारी अभियंता मजीप्रा जेल रोड अमरावती.** | सुबाभूळ | १ | दि.२९/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,मजीप्रा कॅम्प जेलरोड परिसरात एक सुबाभूळ चे वृक्ष तिरपे घराकडे झुकले आहे.जमिनीपासून झाड उखडले असून बाजूची भिंत पडली आहे.पावसामुळे ते वृक्ष घरावर पडण्याची शक्यता आहे.तरी नियमानुसार वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर. | **धोकादायक वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे हमीपत्र सादर करण्याचे अटीवर १ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १६ | **श्रीमती रजनी चौरसिया रा.सुंदरलाल चौक अम.** | जांभूळ<br>कडीपत्ता<br>निंबू | १<br>१<br>१ | दि. २९/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर मोकळया प्लॉट मध्ये मधोमध जांभूळ वृक्ष व एका बाजूला निंबू तसेच कडीपत्ताचे झाड आहे.अर्जदाराला जुने घर व मोकळया प्लॉटवर नवीन बांधकाम करावयाचे आहे.बांधकाम परवानगी,बांधकाम नकाशा मनपा कडून मंजूर करण्यात आला आहे.तिन्ही वृक्ष नकाशा मध्ये वास्तूच्या मध्ये येत असल्याने ती पूर्णपणे तोडण्याची परवानगी मागण्यात आली आहे.करिता नियमानुसार ठेव घेऊन परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे हमीपत्र सादर करण्याचे अटीवर ३ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १७ | **श्री.संदीप दिक्षित रा.राणा नगर** | चिंच | १ | दि.२९/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर चिंच वृक्ष रस्त्याच्या कडेला सार्वजनिक | **धोकादायक वृक्ष काढण्यास** | **सार्वजनिक जागेवरील** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अम.** | | | जागेवर शाळेजवळ आहे.वृक्ष जमिनीपासून ७ फुटापर्यंत पूर्णपणे उधळी व इतर किड्यामुळे पोखरलेला आहे.त्याची एक मोठी फांदी १४ ऑगस्ट रोजी रहदारी रोडवर पडली होती.काही काळानंतर इतरही फांद्या व वृक्ष पडण्याची भीती असल्याने जमिनीपासून पूर्ण झाड काढण्याची आवश्यकता आहे.करिता उद्यान विभागाकडून सदर वृक्ष ताबडतोब काढण्याची शिफारस करण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर. | हरकत नाही. | **धोकादायक वृक्ष उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १८ | **श्री.रामदास भेंडे रा.मालू ले-आऑट अम.** | कडुलिंब | ३ | दि.२९/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर कडूनिंब,सोनमोहर व आपटा वृक्ष सार्वजनिक रस्त्याच्या बाजूला आहे.सोनमोहर वृक्षाच्या फांद्या नवीन बांधकामाकडे झुकल्या असून कडूनिंब व आपटा वृक्षाच्या फांद्या विद्युत वाहिनीवर झुकल्या आहेत.करिता तिन्ही वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागाकडून समतोल राखून कापण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | **अर्जदाराचे बांधकामाकडे झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे बांधकामाकडे झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १९ | **श्रीमती रीना राहुल चुटे रा.रामकृष्ण कॉलोनी अम.** | | १ | दि.२९/०८/२५ रोजी मा. तांत्रिक सदस्या सोबत वृक्ष अधिकारी यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली असता,सदर भिंगरी वृक्ष खुल्या प्लॉट मध्ये रहदारी रस्त्यावर व समोरील घरावर तसेच विद्युत तारावर आलेल्या आहेत.त्यामुळे अर्जदाराच्या घरावरील व विद्युत तारेवरील फांद्या तसेच चहुबाजूने झाडाच्या विस्तारलेल्या फांद्या उद्यान विभागाकडून कापण्यात याव्या जेणेकरून वृक्षाचा तोल एकाबाजूने होणार नाही.करिता उद्यान विभागाला समतोल फांद्या कापण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | **अर्जदाराचे घरावरील झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घरावरील झुकलेल्या व विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

## झोन क्र.४

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **श्री. देविदास सोपान भस्मे. रा. पवन नगर,नवीवस्ती ,बडनेरा** | सागवान (वाळलेले ) | ३ | **दि. १२/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** अर्जदाराचे स्वताचे घराचे आवारात विविध प्रकारची ज्यात आंबा,साग,लिंबू,नारळ इत्यादी वृक्ष छान वाढलेली आहेत अर्जदार वृक्षप्रेमी असल्याचे दिसून आले. अर्जदारास ३ साग वाळलेले वृक्ष काढावयाचे आहेत | **वृक्ष वाळलेला असल्याने सागवान वृक्ष काढण्यास** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:१ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ३** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नियमानुसार वृक्ष प्राधिकरण साग विषयक धोरणानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.<br>**अहवालानूसार ३ वाळलेले सागवान वृक्ष काढण्याची मंजुरी करिता सादर.** | **हरकत नाही.** | **सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | **श्री. सचिन महादेव नंदागवळी रा. जुनिवस्ती, बडनेरा** | वड १<br>पिंपळ १ | २ | **दि. १२/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** वड व पिंपळ वृक्ष सार्वजनिक जागेवर छान वाढलेले व लोकांनी जोपासलेली आहेत त्यास ओटे केलेले आहे कोणतीही अडचण दिसून येत नाही. तथापि अर्जदाराचे घरी गेलेले सर्विस विद्युत वायर झाडाच्या फांद्यामधून गेलेली आहेत विद्युत तारेला स्पर्श करणाऱ्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागाने काढून देण्यास हरकत नाही. फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच विद्युत मंडळाचे सहकार्य घेण्याचे सुचविण्यात यावे.<br>**अहवालानूसार वृक्षांच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर.** | **अर्जदाराचे विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | **साने गुरुजी नगर येथील नागरिक, साईनगर अमरावती** | गुलमोहर | १ | **दि. १२/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** गुलमोहर वृक्ष रस्त्याचे कडेला मनपाने लावलेला छान वाढलेला व हिरवागार आहे रस्त्याकडे झुकलेल्या ( दक्षिण बाजूस) ४-६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात ( मनपा उद्यान विभागाने फांद्या काढण्याची कार्यवाही करावी.)**अहवालानूसार वृक्षांच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर.** | **सार्वजनिक जागेवरील रस्त्याकडे झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **सार्वजनिक जागेवरील रस्त्याकडे झुकलेल्या वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | **गैरअर्जदार श्री. अजय कमलकिशोर राठी रा. साईनगर अमरावती** | १ अशोक<br>२ स्थानिक प्रजातीचे वृक्ष | ३ | **दि. १२/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** गैरअर्जदाराच्या घरासमोर रस्त्याचे कडेला असलेली २ मोठी वृक्ष छाटून केवळ खोड उभे ठेवले आहे तसेच गैरअर्जदाराच्या घरातील १ अशोका वृक्ष देखील गैरअर्जदाराने छाटल्याचे दिसून आले. अवैध वृक्ष तोड केल्याबाबत गैरअर्जदारास दिनांक ०८-०८-२०२५ रोजी नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला सदर खुलासाचे अवलोकन केले असता खुलासा मान्य करण्या योग्य वाटत नाही सबब दंडात्मक कारवाई म्हणून प्रतीवृक्ष ५०००/- प्रमाणे ३ वृक्षाकरिता १५०००/- ( पंधरा हजार रुपये ) दंड आकारण्यास हरकत नाही. दंडविहित मुदतीस न भरल्यास मालमत्ता करामध्ये समाविष्ट करावा. | **अवैधवृक्ष तोड प्रकरणी दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.** | **अवैधवृक्ष तोड प्रकरणी प्रतीवृक्ष ५०००/- प्रमाणे ३ वृक्षाकरिता १५०००/- ( पंधरा हजार रुपये ) दंड आकारण्यात येत आहे. खुलासा फेटाळण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीस सादर.** | | |
| ५ | **गैरअर्जदार श्री.दिलीपभाई पोपट,अध्यक्ष, जलाराम सत्संग मंडळ,भक्तीधाम, साईनगर, अमरावती.** | पिंपळ | १ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-** सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार यांना **भक्तीधाम मंदिर परिसरातील** पिंपळ वृक्षाच्या फांद्या अवैधपणे तोडल्याबाबत जा.क्र.३७५९/२०२५ दिनांक ०८-०८-२०२५ रोजी खुलासाचे पत्र देण्यात आले आहे. खुलासाचे उत्तर अद्याप अप्राप्त आहे.<br>**सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीस सादर.** | **अवैधपणे वृक्ष तोड केल्या प्रकरणी नोटीस दिली आहे.** | **खुलासा अप्राप्त अवैध वृक्ष तोड प्रकरणी ५०००/- रु.दंड आकारण्याची कार्यवाही करण्यात यावी.** |
| ६ | **रहिवाशी, नित्यानंद कॉलोनी, साईनगर अमरावती** | भिंगरी | १ | **दि. २९/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** (A) भिंगरी वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाचा पश्चिमेकडील झुकलेल्या ३-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची कारवाई करण्यात यावी. फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.तसेच विद्युत मंडळाचे सहकार्य घेऊन फांद्या काढण्यास हरकत नाही.<br>(B) वृक्षाच्या बुडापर्यंत केलेले कॉंक्रीट काढण्याची कारवाई संबधित विभागाने करावी तसेच वृक्षाचे बुडाजवळ कचरा जाळल्या जातो असे दिसून आले करिता स्वास्थ निरीक्षक यांना याबाबत सूचना देण्यात याव्यात.**अहवालानूसार वृक्षांच्या फांद्या काढण्याची मंजुरी करिता सादर.** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.स्वास्थ्य निरीक्षकास वृक्षाजवळ कचरा जाळण्यात येत असल्याबाबत वृक्ष अधिकारी यांनी सूचित करावे.** |
| ७ | **मुख्याधापक, एस .एल.पब्लिक स्कुल जुनिवस्ती बडनेरा** | महारुख | १ | **दि. २९/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** महारुख वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेल्या व हिरवागार आहे सदर महारुख वृक्षाच्या फांद्या पूर्वीच काढण्यात आल्या असून खोडला आता पालवी फुटल्याचे दिसून येते. वृक्षाला लागलेली किडीचे नमुने घेण्यात आले असून प्रयोगशाळाचे अहवाल प्राप्तीनंतर वृक्ष काढण्याबाबत किंवा कसे ? यावर विचार करता येईल.**सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीस सादर.** | **प्रयोगशाळाचे अहवाल प्राप्तीनंतर प्रकरण सादर करावे.** | **प्रयोगशाळाचे अहवाल प्राप्तीनंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** |
| ८ | **श्री. प्रज्वल प्रनमजी मालू. रा. मौजे** | कडूनिंब ६<br>पिंपळ १ | १५ | **दि. २९/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** A) अर्जदारास जमीन विकसित करावयाची आहे व्यवसायीक बांधकाम | **फेर पाहणी करण्यात यावी.अर्जदा रास त्रुटींची** | **तांत्रिक सदस्य यांचे सोबत प्रत्यक्ष फेर पाहणी करून** |

<table>
<tr>
<td></td>
<td>सातुर्णा सर्वे क्र २८/३</td>
<td>आडजात ८</td>
<td></td>
<td>करण्यासाठी ४० आर जागेवर सं.स.न.र विभागाने बांधकाम परवानगी दिल्याचे दिसून आले तथापी प्रत्यक्ष बांधकामात येणारी वृक्ष व राखल्या जाणारी वृक्ष चिन्हाकित केलेली नाहीत सबब सं.स.न.र ला पत्र देऊन सदर बांधकामात किती वृक्ष प्रत्यक्ष येतात किवा कसे याचा स्पष्ट अहवाल मागविण्यात यावा.<br>B) तसेच अर्जदाराने दर्शविलेल्या सर्व वृक्षाची स्वतंत्र यादी खालील प्रमाणे सादर करावी
<table>
<tr><td>अ. क्र.</td><td>वृक्ष क्र</td><td>वृक्षाचे नाव</td><td>वृक्षाचे वय</td><td>वृक्षाची उंची</td></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td></tr>
</table>
C) सं.स.न.र चे प्राप्त अहवालानुसार सर्व वृक्षांवर ६x६ इंच पिवळया पेंटनी केलेल्या चौकोनात काढावयाची वृक्ष लाल रंगानी व राखावयाची हिरव्या रंगानी चिन्हाकित करून सादर करावे त्यानंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल तूर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी व वृक्षाला कोणतीही इजा पोचवू नये असे आदेशित करण्यात यावे.<br>अहवालानूसार वृक्ष तोडण्याची परवानगी तुर्त नाकारण्याकरिता करिता सादर.</td>
<td>पूर्तता करण्याकरिता कळविण्यात यावे. तुर्त प्रकरण स्थगित ठेवण्यात यावे.</td>
<td>प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.तूर्त वृक्ष काढण्याची परवानगी स्थगित ठेवण्यात येत आहे.</td>
</tr>
<tr>
<td>९</td>
<td>श्री हमीद खान रा. पवन नगर नवीवस्ती बडनेरा</td>
<td>महारुख</td>
<td>१</td>
<td>दि. २९/०८/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- महारुख वृक्ष रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार असून कोणतीही अडचण दिसून आली नाही अर्जदाराचा व वृक्षाचा काही संबध नाही सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी वृक्षाला इजा पोचवू नये असे आदेशित करण्यात यावे.अहवालानूसार वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्याकरिता करिता सादर.</td>
<td>अर्जदाराचा वृक्षाचा काहीही संबंध नाही.</td>
<td>वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.</td>
</tr>
<tr>
<td>१०</td>
<td>श्री भास्कर उत्तमराव चवात राह. नवाथे नगर अमरावती</td>
<td>स्थानिक प्रजाती चा वृक्ष</td>
<td>१</td>
<td>वृक्ष अधिकारी यांचा अहवाल:-अर्जदारास यापूर्वी सभा दिनांक १८/०७/२०२५ रोजीचे मंजूर ठराव क्र ७ अन्वये वृक्षतोड केल्याबाबत जा.क्र. ३५५० दि ३१/०७/२०२५ नुसार खुलासाची पत्र देण्यात आले होते त्यानुसार अर्जदार यांनी दि. ०१/०८/२०२५ रोजी खुलासा सादर केला आहे सदर खुलासावर मा.तांत्रिक सदस्य याचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे<br>तांत्रिक सदस्यांचा दि.२९/०८/२०२५ अहवाल:- सदर प्रकरणी दि. १५/०७/२०२५ रोजीचे अहवालानुसार प्राप्त झालेल्या अर्जदाराचे खुलासाचे अवलोकन केले. विना परवानगी वृक्ष तोडल्याचे कबुल केलेले दिसते सबब नियमानुसार दंडात्मक</td>
<td>अवैधवृक्ष तोड प्रकरणी दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.</td>
<td>अवैधवृक्ष तोड प्रकरणी प्रतीवृक्ष ५०००/- ( पाच हजार रुपये ) दंड आकारण्यात येत आहे.खुलासा फेटाळण्यात येत आहे.</td>
</tr>
</table>

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कारवाई म्हणून ५०००/- (अक्षरी पाच हजार रुपये ) दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. व खुलासा अमान्य करण्यात यावा.<br>**सदर अहवाल आपल्या माहितीस व पुढील कार्यवाहीस सादर.** | | |

## झोन क्र.५

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **श्रीमती ललिता तुकाराम सावरकर रा.महाजनपुरा, अमरावती** | १ पिंपळ वृक्ष | १ | दिनांक ३०/०८/२०२५ रोजी स्थळ निरिक्षण केले. अर्जदार नझूल जागेवरील घरात राहतात असे सांगण्यात आले पिंपळ वृक्ष अर्जदाराच्या घरा समोर छान वाढलेले व हिरवेगार आहे.पिंपळ वृक्षाच्या बुडापर्यंत कॉंक्रीट केल्याचे दिसून आले कॉंक्रीट काढण्याच्या सूचना अर्जदारास देण्यात याव्या दक्षिणे कडील विद्युत तारे कडे रस्त्यावर झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर. | **अर्जदाराचे विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे विद्युत तारेकडे झुकलेल्या वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | **गजानन श.मुकवाने रा.आनंद नगर ,अमरावती** | वड वृक्ष फांद्या | १ | दिनांक ३०/०८/२०२५ स्थळ निरिक्षण केले. पिंपळ वृक्ष एक मुखी दत्त मंदिर परिसरात छान वाढलेले व हिरवेगार आहे.वृक्षाच्या फांद्या मंदिरा शेजारी राहणा-या अर्जदार श्रीमती मुकवाने यांच्या घराकडे झुकलेले आहे. रस्त्याकडील झुकलेल्या ३-४ इंच व्यासाच्या फांद्या मनपा उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **अर्जदाराचे घराकडे झुकलेल्या वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | **श्री प्राचार्य शासकीय विद्यानिकेतन नागपूरी गेट अमरावती.** | विविध वृक्ष | -- | दिनांक ३०/०८/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले शासकीय विद्यानिकेतन नागपूरी गेट अमरावती. शासकीय विद्यानिकेतन हे परिसर बराच मोठा असून त्यात हॉस्टेल इत्यादींचा समावेश आहे. सदर परिसरात विविध प्रकारचे मोठमोठे वृक्ष असल्याचे आढळून आले करिता अर्जदारास त्यांचे परिसरातील वृक्षाची यादी खालील प्रमाणे मागविण्यात यावी.<br>अ. क्र. \| वृक्ष क्र \| वृक्षाचे नाव \| वृक्षाचे वय \| वृक्षाची उंची<br>१ \| २ \| ३ \| ४ \| ५ | **अर्जदारास पत्र देवून माहिती मागविण्यात यावी.** | **माहिती प्राप्त झाल्यानंतर प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.तूर्तास प्रकरण स्थगित ठेवण्यात येत आहे.** |

# वेळेवरील विषय

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | **दिनेश बूब** | उंबर वृक्ष | १ | दिनांक १४/०८/२०२५ रोजी उपभियंता झोन क्र २ बांधकाम विभाग यांचा प्राप्त अहवाल. श्री. दिनेश बुब श्री. सुशील गोलेच्छा, श्री. पुनसे यांची वसंत चौक राका मॉल येथील शिकस्त इमारत पाडण्या करीता पत्र क्र. २९५ दि. २५/०६/२०२५ रोजी नोटीस देण्यात आलेली होती, त्यानुसार त्यांनी दोन मजले पाडले आहे. इतर मजले पाडण्याची कार्यवाही सुरु आहे, सदर भाग अतिशय दाट वस्तीचा असून व्यापारी मार्केट आहे व आजूबाजूला रहिवासी क्षेत्र आहे. पाडण्यात आलेल्या इमारतीचा मलमा हटविणे आवश्यक आहे. त्यामधील विंचू, साप इतर जिवीत हानी होऊन परिसरात दुर्गंधी वातावरण होवू नये म्हणून मलमा ट्रक, टिप्पर द्वारे हटविणे आवश्यक आहे. अंदाजे १०० ट्रक मलमा आहे. या भागात मलमा वाहून नेण्यासाठी रस्त्यावर १ उंबराचे ०.३० Mts व्यासाचे व ३० फुट उंचीचे उंबराचे झाड असल्यामुळे ट्रक, टिप्पर वाहतूक करता येत नाही. सदर झाड काढणे आवश्यक आहे. तरी त्यांना योग्य शुल्क भरून उंबराचे १ झाड काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाहीं, उचित निर्णयास सादर | **वृक्ष नाली बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ०१ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २. | उद्यान विभाग महानगरपालिका अमरावती | -- | -- | उद्यान विभागातील कामाचा व्याप अतिशय मोठा असून उपलब्ध यंत्रणा अतिशय तोकडी आहे. महानगरपालिका क्षेत्रात मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, डिव्हायडर व उद्याने सार्वजनिक वापराच्या असंख्य खुल्या जागा असून त्यावरील झाडाचे branching करावे लागते. या कामाकरिता या विभागात फक्त दोन मशीन्स उपलब्ध असून त्यापैकी एक Expire for use होत आहे. या मशिनला नेहमी दुरुस्ती करावी लागत असून त्याचे सुटे भाग लोकल मार्केट ला उपलब्ध नसतात. त्यामुळे या विभागास नागरिक तसेच राजकीय पदाधिकारी यांचा प्रचंड रोष सहन करावा लागतो. तसेच विद्युत वाहिनीच्या खाली वाढणारे वृक्ष काढणे हा एक वेगळाच Task या विभागास करावा लागतो, ती एक तातडीची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी लागते, यंत्रणा अतिशय तोकडी असल्यामुळे विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रचंड तणावाखाली काम करावे लागत आहे.<br>या करिता या विभागाचे सक्षमीकरण करणे अतिशय आवश्यक आहे. पावसाळ्याच्या दिवसात म्हणजे जून ते नोव्हेंबर म्हणजे दिवाळी पर्यंत tree branching ची कामे करावीच लागतात, तोकड्या यंत्रणेमुळे अतिशय ओढताण होत असून नागरिक व राजकीय प्रतिनिधी यांचे | **उपलब्ध निधीच्या अधीन राहून मशिन खरेदी प्रक्रिया करण्यास हरकत नाही.** | **उपलब्ध निधीच्या अधीन राहून वृक्षांची देखभाल/ फांद्या काढण्याकरिता ४ नग शक्तिमान मशिन खरेदी करण्याच्या प्रक्रियेस मंजुरी देण्यात येत आहे.पुढील प्रक्रिया कार्यशाळा विभागाने करावी.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सोबत रोजच कर्मचाऱ्यांना वादाच्या भांडणाच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागत आहे जी अतिशय गंभीर बाब आहे.<br>मा. आयुक्त यांनी दि.1/08/2025 ला झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या सभेमध्ये सदर मशिन `वृक्ष प्राधिकरण' या शिर्षातंर्गत जमा निधी/रक्कमे मधून नवीन मशीन खरेदी करणे संदर्भातील प्रस्ताव सादर करण्यास निर्देशित केले आहे. यापूर्वी मशीन्स खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव DPDC मध्ये सादर करण्यात आला होता. परंतु तेथे सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर यंत्राची खरेदी मनपा शिर्ष किंवा इतर शासन शिर्षामधून करता येऊ शकेल.<br>मा. मुख्यलेखापरिक्षक यांचे कडे चौकशी केली असता `वृक्ष प्राधिकरण' शिर्षातंर्गत पुरेसा निधी अंदाजे 1.5 कोटी रु. उपलब्ध आहे. या निधीमधून सदर खरेदीची कारवाई करता येईल. अमरावती मनपा क्षेत्रात एकूण दोन विधानसभा क्षेत्र येतात प्रशासकीय कामाचे दृष्टीने एकंदर पाच झोन कार्यालये आहेत प्रत्येक झोन कार्यालया करिता एक असे एकूण 5 (पाच) यंत्राची (शक्तिमान)उपलब्धता करणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या एक मशिन व्यवस्थित असून उर्वरीत 4 नग शक्तिमान मशीन खरेदीची प्रक्रिया करण्यास हरकत नाही, यंत्रसामुग्रीची खरेदी, देखभाल व दुरुस्ती ही कार्यशाळा विभागा कडून होत असते, त्यामुळे पुढील प्रशासकीय प्रक्रिया त्यांचे विभागाकडूनच होणे अपेक्षित आहे.<br>सबब उद्यान विभागा करिता 4 नग शक्तिमान यंत्रे (tree branching machine) खरेदी करण्याचे प्रकरण वृक्ष प्राधिकरण सभेत मंजुरीकरीता सादर. | | |
| ३. | उद्यान विभाग महानगरपालिका अमरावती | | | **विषय :- वृक्ष गणना अहवाल तपासणी करणे बाबत**<br>**संदर्भ :- १. अमनपा/उ.वि./जा.क्र.२८८/२०२३ दि.१९/०५/२०२३**<br>**२.ornet Technologies यांचे दि.२३/०८/२०२४ रोजीचे प्राप्त वृक्ष गणना अहवाला नुसार**<br><br>उपरोक्त विषयानुसार अमरावती महानगरपालिका हद्दीतील वृक्ष गणना सन २००८-२००९ मध्ये करण्यात आली होती.त्यानुषंगाने अमरावती महानगरपालिका हद्दीतील वृक्ष गणना करणे गरजेचे असल्याने GEM पोर्टल वर AMC/G.D/Dy.Engg/NIT/82/23 date 19.04.2023 नुसार ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये Ornet Technologies PVT.LTD. Navi Mumbai. यांना अमनपा/उ.वि./जा.क्र.२८८/२०२३ दि.१९/०५/२०२३ नुसार अमरावती महानगरपालिका हद्दीतील वृक्ष गणना करण्याचे काम देण्यात आले होते. | **सर्विस्तर चर्चा करण्यात आली.सॉफ्ट कॉपी / चार हार्ड कॉपी सादर करण्याच्या सूचना देण्यात याव्या.** | **तांत्रिक सदस्य/मुख्य वृक्ष अधिकारी /वृक्ष अधिकारी यांचे द्वारा प्रभाग निहाय १०% तपासणी करण्यात यावी.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | त्यानुषंगाने सदर कंपनी कडून संपूर्ण वृक्ष गणना अहवाल सादर करण्यात आला असून मा.वृक्ष प्राधिकरण समिती यांच्या समक्ष सदर वृक्ष गणनेचे सादरीकरण करणे करीता सादर. | | |

Digitally signed by
SHILPA INDALCHAND NAIK
Date: 12-09-2025
13:52:27

**अतिरिक्त आयुक्त-२**

**महानगरपालिका, अमरावती**